# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

## पुनर्विलोकन अर्ज १८७ / २०२२

(मुळ अभिवेदन क्र. १४३ / २०२२ च्या अभिवेदनाबाबत )

जास्तीचे वीज देयकाबाबत

मेसर्स रानीदेवी छोटेलाल चौरसिया ........................................................................................ अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) कल्याण ग्रामीण.............................. .......... .... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- छोटेलाल चौरसिया
जगनसिंह राजपूत, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- वसंत गावकरे, उपकार्यकारी अभियंता
शिवाजी काळे, सहाय्यक लेखा अधिकारी

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- ६ फेब्रुवारी २०२३

आदेश पारित दिनांक :- १७ फेब्रुवारी २०२३

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम २२ नुसार विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या पारीत आदेशाविरुध्द अभिवेदन क्र. १४३ /२०२२ बाबत पुनर्विलोकनासाठी अपिलार्थीनो सदरचे पुनर्विलोकन अभिवेदन दिनांक ८ डिसेंबर २०२२ रोजी दाखल केलेले आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

२.	विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ च्या (अभिवेदन क्र.१४३/२०२२) आदेशान्वये निकाली काढताना खालील प्रमाणे निर्देश दिले.

- ✓ *"माहे मार्च 2020 ते फेब्रुवारी 2022 या कालावधीत वीज वापर 220 युनीट प्रती महिना विचारात घेऊन सुधारीत पुरवणी वीज देयक करून देण्यात यावे.*
- ✓ *आकारलेले व्याज व विलंब आकारणी 'पुरवणी वीज देयक' दिल्यापासून ते आदेशाच्या तारखेपर्यंत माफ करण्यात येत आहे.*
- ✓ *अपिलार्थीस चालू महिन्याचे वीज देयकासह पुरवणी वीज देयक विचारात घेऊन समान दहा हफ्त्यात वीज देयक भरण्याची परवानगी देण्यात येत आहे. दिलेल्या हफ्त्यावर व्याज व विलंब आकार लागणार नाही. तथापि, अपिलार्थीने चालू महिन्याचे वीज देयक व दिलेले हफ्ते वेळेत न भरल्यास त्यावर नियमानूसार व्याज व विलंब आकार लागू होईल, व प्रतिवादी त्यांच्यावर नियमानूसार कारवाई करू शकतात.*
- ✓ *अपिलार्थींच्या इतर मागण्या नामंजूर करण्यात येत आहेत."*

३.	अपिलार्थींनी आपल्या पुनर्विलोकन अर्जात उपस्थित केलेले मुद्दे संक्षिप्तपणे खाली नमुद केले आहेत.

- ➢ डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०२२ या कालावधीत अपिलार्थी मीटर (क्र.०७५१३८९५९१५) वाचनाप्रमाणे नियमित वीज देयकांचा भरणा करत होते. त्यानंतर प्रतिवादींनी अपिलार्थीस ऑगष्ट २०१८ ते एप्रिल २०१९ या कालावधीत 'आरएनटी' (रिडींग नॉट टेकन) या स्टेटसखाली व मे २०१९ ते फेब्रुवारी २०२२ पर्यंत 'फॉल्टी' स्टेटस दाखवून वीज देयके देण्यात आली, त्या वीज देयकांचा सुध्दा अपिलार्थीने भरणा केला आहे. तथापि मार्च २०२२ मध्ये मीटर क्र.०७५१४१२९८५० दाखवून अपिलार्थींना रु.६२१०२/- ची थकबाकी दाखवून एकूण रु.६३७६७/- चे जास्तीचे वीज देयक देण्यात आले.

- ➢ परंतू अपिलार्थीचे मीटर (क्र.०७५१३८९५९१५) हा सदोष असल्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २०२१ (कृती मानके, विनियम २०२१) विनियम १६.४.१ नुसार सदरहू मीटर तीन महिन्याच्या आत बदलणे गरजेचे होते. तथापि, तो बदलला नाही.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- अपिलार्थीने ३ मार्च २०२२ रोजी सदर मीटर क्र.०७५१३८९५९१५ बदलून त्याजागी क्र.०७५१४१२९८५० चा मीटर लावला त्या मीटरवर आरंभीचे रिडींग ११००० केडब्लूएच होते. अपिलार्थी हे रिडींगप्रमाणे वीज देयके भरण्यास तयार आहेत. तथापि, प्रतिवादींनी मार्च २०२२ च्या वीज देयकात मागील पुरवणी वीज देयक रु.६२,१०२/- अदा केले ते नियमानुसार नाही.

- अपिलार्थीने नमुद केले की, डिसेंबर २०१६ ते नोव्हेंबर २०२२ कालावधीत रु.६६८०६/- चा भरणा केलेला आहे. तसेच रु.२००००/- हे अनामत रक्कम म्हणून माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्याकडे भरणा केला होता ते सुध्दा सदर कार्यालयाने आपल्याकडे १० जानेवारी २०२३ रोजी एनइएफटी द्वारे पाठविले आहे. त्या रु.२००००/- वे क्रेडीट आतापर्यंत मिळाले नाही. त्याचा परतावा तात्काळ करण्यात यावा.

- प्रतिवादी हे माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ च्या (अभिवेदन क्रं.१४३/२०२२) आदेशाप्रमाणे योग्य ते वीज देयके सुधारीत करुन देत नाहीत व अपिलार्थींची दिशाभूल करतात. म्हणून अपिलार्थींनी पुनर्विलोकन अर्ज दाखल केला आहे.

४. प्रतिवादी यांनी दिनांक ३० डिसेंबर २०२२ रोजी सादर केलेल्या उत्तरातील प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ च्या (अभिवेदन क्रं.१४३/२०२२) च्या आदेशात दिलेले निर्देश परिच्छेद क्र.२ घेतलेले आहेत. त्याकाळात अपिलार्थीस रु.५२५०७.१६ चे वीज देयक देण्यात आले होते. माननीय विद्युत लोकपाल यांच्या आदेशान्वये अपिलार्थीचे वीज देयक २४ महिन्यात *(फेब्रुवारी २०२० ते फेब्रुवारी २०२२)* या कालावधीसाठी दुरुस्त करुन दिले. त्यामुळे अपिलार्थींना रु.१७६६२.६८ चे वीज देयक बी८० प्रमाणे सक्षम अधिकारी यांच्या मंजूरीनंतर देण्यात येत आहेत.

- अपिलार्थींनी पुनर्विलोकन अर्जात कोणतीही नवीन बाब / मुद्दा निदर्शनात आणून दिला नाही, तसेच, आदेशात कोणतीही चुक,त्रुटी किंवा दोष असल्याचे निदर्शनास आणून दिले नाही. पुनर्विलोकन अर्जात मागील अभिवेदनांतील बाबींची पुनरावृत्ती आहे. सबब, अपिलार्थीचा पनर्विलोकन अर्ज ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२० मधील विनियम २२ नुसार फेटाळण्यात यावा ही विनंती.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

**विश्लेषण व निर्णय.**

५. दोन्ही पक्षकारांची बाजू एकण्यात आली व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन कले.

६. अपिलार्थी यांनी सदर पुनर्विलोकन अर्जात कोणतेही नवीन मुद्दे उपस्थित केलेले नाहीत; की, ज्यामुळे मुळ आदेशात बदल करणे गरजेचे आहे. पुनर्विलोकन याचिकेची व्याप्ती ही मर्यादित असते; मात्र, अपिलार्थी या ठिकाणी पुनर्विलोकन याचिकेच्या माध्यमातून संपूर्ण प्रकरणाची पुनश्चः सुनावणी घेण्याची विनंती करीत आहेत, असे, प्रथम दर्शनी दिसते. मात्र, मुळ आदेशांचा आढावा घेण्याचे कोणतेच कारण नव्याने समोर आलेले नाही.

७. ग्राहक गाऱ्हाणे विनियम, २०२० मधील विनियम २२ मध्ये पुनर्विलोकना बाबत खालील प्रमाणे तरतुद आहे :-

*"२२ विद्युत लोकपालाच्या आदेशाचे पुनर्विलोकन :*

*२२.१ विद्युत लोकपालाच्या आदेशाने बाधीत झालेली कोणतीही व्यक्ति, वितरण परवानाधारकासह, आदेशाच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत अशा आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी त्याच विद्युत लोकपालाकडे खालील परिस्थितीत, अर्ज करील:*

*ए. जेथे कोणत्याही अपिलास प्राधान्य देण्यात आले नाही.*

*बी. अभिलेख्यावरून चूक किंवा दोष असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्यास.*

*सी. एखादी नवीन आणि महत्वाची बाब किंवा पुरावा मिळाला, जो योग्य काळजी घेऊनही तिला ज्ञात नव्हता किंवा जो आदेश पारीत करण्यात आला त्या वेळेस सादर करू शकला गेला नाही.*

*२२.२ अशा पुनर्विलोकनासाठीच्या अर्जात ती बाब किंवा पुरावा, जो योग्य काळजी घेऊनही अर्जदाराला ज्ञात नव्हता किंवा जो आदेश देण्याच्या वेळेस सादर करू शकला गेला नाही, किंवा अभिलेखावरून चुक किंवा दोष असल्याचे सकृतदर्शनी दिसते त्याबाबत, स्पष्टपणे नमुद करण्यात येईल.*

*२२.३ पुनर्विलोकन अर्जासोबत विद्युत लोकपाल निश्चित करेल अशी कागदपत्रे, पुष्टयर्थ माहिती आणि निवेदने जोडण्यात येतील.*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

२२.४ *विद्युत लोकपालास जर पुनर्विलोकनासाठी पुरेसे कारण नसल्याचे वाटल्यास, विद्युत लोकपाल असा पुनर्विलोकन अर्ज फेटाळेल.*

*परंतू असे की, अर्जदाराला त्याची बाजु मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणताही अर्ज फेटाळण्यात येणार नाही.*

२२.५ *जर विद्युत लोकपालाचे असे मत झाले की, पुनर्विलोकन अर्ज मंजूर करणे योग्य आहे, तर विद्युत लोकपाल तो मंजूर करेल. परंतू असे की, पुनर्विलोकनाचा अर्ज ज्या आदेशाच्या संदर्भात करण्यात आला आहे त्याच्या समर्थनार्थ उपस्थित राहणे व त्याची बाजू ऐकली जाणे शक्य व्हावे म्हणून, विरोधी पक्षकाराला पुर्व-सूचना दिल्याशिवाय असा अर्ज मंजूर केला जाणार नाही."*

८. संपूर्ण प्रकरणाचा विचार करता, पुनर्विलोकन अर्जात अभिवेदन क्र.१४३/२०२२ च्या आदेशाचे अनुपालन योग्य न केल्याबाबतचा आहे. तथापि, सदर पुनर्विलोकन अर्ज हा सदरहू आदेशातील दोष वा त्रुटी असल्याबाबतचा नाही. सबब विनियम २२ मधील तरतुदो पाहता, सदरचा पुनर्विलोकन अर्ज फेटाळण्यात येत आहे.

९. प्रतिवादींना सुचीत करण्यात येते की, विद्युत लोकपाल यांच्या आदेशात "*माहे मार्च २०२० ते फेब्रुवारी २०२२ या कालावधीत वीज वापर २२० युनीट प्रती महिना विचारात घेऊन सुधारीत पुरवणी वीज देयक करुन देण्यात यावे व आकारलेले व्याज व विलंब आकारणी 'पुरवणी वीज देयक' दिल्यापासून ते आदेशाच्या तारखेपर्यंत माफ करण्यात येत आहे.*" असे नमुद केले आहे. तथापि प्रतिवादींनी वीज देयक सुधारीत करताना फेब्रुवारी २०२० ते फेब्रुचारी २०२२ असा २५ महिण्याचा कालावधी घेतला आहे. तो चुकीचा आहे. म्हणून योग्य २४ महिण्याचा कालावधी व्याज व विलंब आकारणी वजा करून देण्याचे आदेशीत करण्यात येत आहे.

१०. पुनर्विलोकन आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत अनुपालन अहवाल सादर करावा.

११. सदरहू पुनर्विलोकन अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.